Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004**
**MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५


संदर्भ क्र./शिवाजी वि/संलग्नता/टी-२/ No 1196 दि. 30 JUN 2026

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या गुणवंत मुला-मुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२६-२७ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संदर्भ क्र१८/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२६-२७/३२६, दि.१७/०६/२०२६ रोजीच्या प्राप्त ई-मेल.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील"खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या गुणवंत मुलामुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजनेंतर्गत शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता https://dte-fs.trti-maha.in:82 व https://fs.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर Online पध्दतीने अर्ज मागाविण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या महाविद्यालयाच्या स्तरावर योग्यती कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

कळावे

आदेशान्वये
(डॉ. पी. एस. पांडव)
उपकुलसचिव
संलग्नता टी - २ विभाग

सोबत संदर्भिय पत्र जोडले आहे.

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७९/४९६/४२१
ई-मेल-foreignscholarship.desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: १८/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२६-२७/ ३२६ दिनांक: १७/६/२०२६

प्रति,

मा. कुलगुरु,

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
२) मुंबई विद्यापीठ, मुंबई
३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
४) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
६) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
७) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
८) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
१०) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
११) कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
१२) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
१३) रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई
१४) सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

विषय: उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या गुणवंत मुला-मुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२६-२७ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भ: शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. पशियो-२०२६/प्र.क्र.१४७/ई-१६६५४६०/तांशि-४, दि. १०.०६.२०२६

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भाधिन दिनांक १०.०६.२०२६ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत "खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या गुणवंत मुला-मुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना सन २०२६-२७ पासून अंमलात आणण्यात येत आहे. या योजनेतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आंतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतात त्यांना ही शिष्यवृत्ती देय ठरते. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता ४० विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता Online पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रीया संचालनालयाच्या https://dte-fs.trti-maha.in:82 व https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन दि. १५.०६.२०२६ पासून सुरु करण्यांत आलेली आहे. सोबत याबाबतची जाहिरात जोडलेली आहे.

सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत:

- उमेदवार व उमेदवाराचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्ययावत (सन २०२६ मधील) QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आंत असणे बंधनकारक आहे.
- उमेदवाराच्या पालकांचे/कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे लगतच्या मागील आर्थिक वर्षातील कौटुंबिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करिता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या https://dte-fs.trti-maha.in:82 व https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर संदर्भीय शासन निर्णय उपलब्ध करुन आला आहे, त्याप्रमाणे या शिष्यवृत्तीबाबतच्या अर्जांची छाननी होणार आहे.

सबब इच्छुक उमेदवारांनी https://dte-fs.trti-maha.in:82 व https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्याची दि. १५.०६.२०२६ ते दि. १६.०७.२०२६ मुदत अशी आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालयात दिनांक १६ जून २०२६ ते १७ जुलै २०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावयाची आहेत.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी विनंती करण्यांत येत आहे.

१) सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यांत यावी.
२) आपल्या विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईट, ट्विटर अकाऊंटवरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.
३) कॅम्पस रेडिओ, विद्यापीठाचे न्युज लेटर या दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन सदर योजनेची माहिती व जाहिरात यास प्रसिध्दी द्यावी.
४) आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या व्हॉटसअप ग्रुप तसेच माजी विद्यार्थी संघटनेच्या व्हॉटसअप ग्रुप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यांत याव्यात.
५) सर्व समाजमाध्यमांकडून (social media) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु ट्युब, इ. माध्यमांचा सुध्दा वापर करावा.
६) सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या विद्यापीठाच्या परिपत्रकांव्दारे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे आपल्याशी संलग्नित सर्व संस्थांना, सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात यावे.

आपला

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीकरीता सादर:-

मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांना माहिती साठी सविनय सादर.

प्रत आवश्यक कार्यावाही करीता:-

१) मा. संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे यांना कळविण्यात येते की, सदर योजनेबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व विभागीय कार्यालयामार्फत शैक्षणिक संस्थांना या बाबत अवगत करावे.
२) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर यांना निर्देशित करण्यात येते की, सदर जाहीरातीनुसार आपापल्या विभागातील सर्व शैक्षणिक संस्थांना या बाबत अवगत करावे व वेळापत्रकात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४२१
ई-मेल-foreignscholarship.desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

## जाहिरातीचा मसुदा

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील "खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या गुणवंत मुलामुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर पदविका व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल, अशा विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या करीता सदर योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी online पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा/अभ्यासक्रमनिहाय जागा उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | शाखा/अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका |
|---|---|---|
| १ | कला | ०३ |
| २ | वाणिज्य | ०३ |
| ३ | विज्ञान | ०५ |
| ४ | व्यवस्थापन | ०४ |
| ५ | विधी अभ्यासक्रम | ०३ |
| ६ | अभियांत्रिकी/तंत्रज्ञान | १५ |
| ७ | वास्तूशास्त्र | ०३ |
| ८ | औषधनिर्माण शास्त्र | ०४ |
| | | ४० |

सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

१. उमेदवार व उमेदवाराचे आई/ वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.

२. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्ययावत (सन २०२६ मधील) QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आत असणे बंधनकारक आहे.

३. उमेदवाराच्या पालकांचे/कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखांपेक्षा जास्त नसावे.

४. या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुज्ञेय लाभ, निवड कार्यपध्दती, व या कार्यक्रमाचे वेळापत्रक इत्यादी माहितीकरीता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या https://dte-fs.trti-maha.in:82 व https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

५. ही योजना फक्त खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता लागू राहील. ज्या मागास प्रवर्गाच्या किंवा अन्य विविध प्रवर्गासाठीच्या/ अल्पसंख्यांक समुदायाच्या परदेशी शिष्यवृत्तीसाठी योजना विद्यार्थ्यांना /उमेदवारांना लागू करण्यात आलेल्या आहेत त्या त्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी/

शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र असलेले विविध प्रवर्गातील व अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थी वगळून इतर सर्व उमेदवार/विद्यार्थी या योजनेसाठी खुल्या प्रवर्गाचे उमेदवार/विद्यार्थी पात्र समजण्यात येतील.

६. या योजनेकरीता पीएच.डी अभ्यासक्रमाचे अर्ज प्राप्त झाल्यास, अश्या विद्यार्थ्यांना प्रायोजकत्व (Sponsorship) न मिळाल्याची खात्री करून त्यांचा विचार करण्यात येईल.

७. इच्छुक उमेदवारांनी https://dte-fs.trti-maha.in:82 व https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर online पध्दतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत, मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित विभागीय कार्यालयात खालील वेळापत्रकानुसार सादर करावीत.

| अ.क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर Online पध्दतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे | १५ जून २०२६ ते १६ जुलै २०२६ |
| २ | उमेदवारांनी खालीलप्रमाणे शाखा /अभ्यासक्रमनिहाय Online भरलेल्या अर्जांची प्रत, मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह विभागीय कार्यालयात पडताळणीसाठी अर्ज सादर करण्याची मुदत<br><br>१. कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केला आहे व उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण या ठिकाणी<br>२. व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तूकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केला आहे, त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण या ठिकाणी | <br><br><br><br>१६ जून २०२६ ते १७ जुलै २०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |

उच्च शिक्षण विभागीय कार्यालये व तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयांची पत्तानिहाय माहिती वरील संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

Online अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही पध्दतीने अर्ज केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. इच्छुक उमेदवारांनी निर्धारित कालावधीत वरीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे व त्यांनतर सदर अर्जदारांना याबाबतची सर्व माहिती/सूचना उपरोक्त संकेतस्थळावरुनच देण्यात येतील त्यानुसार त्यांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

स्वा/-
(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक
तंत्र शिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई